आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
८ नोव्हेंबर २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- संसदेचं हिवाळी अधिवेशन १ डिसेंबरपासून सुरू होणार

- न्यायाची भाषा ही सामान्य नागरिकांना सहज समजण्याइतकी सोपी करण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आवाहन

- बिहार आणि पंजाबमध्ये निवडणूक प्रक्रियेतल्या त्रुटी प्रकरणी IAS, IPS अधिकाऱ्यांचं निलंबन

आणि

- भारतानं ऑस्ट्रेलियाविरुद्धची टी-ट्वेंटी मालिका २-१ नं जिंकली

**<><><><>**

संसदेचं हिवाळी अधिवेशन येत्या १ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे ही माहिती दिली. १९ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनात लोकशाही बळकट करणं आणि सामान्य नागरिकांच्या आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीनं सकारात्मक चर्चा व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी पदाची सूत्रं स्वीकारल्यानंतर राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष म्हणून त्यांचं हे पहिलंच अधिवेशन असणार आहे. त्यांनी १२ सप्टेंबर रोजी उपराष्ट्रपतीपदाची शपथ घेतली होती.

**<><><><>**

न्यायाची भाषा ही सामान्य नागरिकांना सहज समजण्याइतकी सोपी असावी, असं मत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केलं. नवी दिल्लीत सर्वोच्च न्यायालयात कायदेशीर मदत पोचवण्याची प्रक्रिया बळकट करण्याविषयीच्या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. न्यायदानाची प्रक्रिया सोपी करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

***होल्ड... बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

सामान्य नागरिकांमध्ये कायदेशीर प्रक्रियांबद्दल जागृती वाढवणं आणि न्यायप्रक्रियेच्या बळकटीकरणासाठी त्यात तंत्रज्ञानाचा अंतर्भाव करणं याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

न्यायालयीन सहाय्य म्हणजे देशबांधणीत योगदान देणं आहे, असं प्रतिपादन सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी केलं. लोकांच्या जीवनात परिवर्तन आणण्याचं डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं स्वप्न साकार करणं हेच न्यायालयीन सहाय्य चळवळीचं ध्येय असल्याचं ते म्हणाले.

तर, तरुणांनी न्यायदानाकडे फक्त एक औपचारिक जबाबदारी म्हणून नाही, तर एक नागरिक-केंद्रित सेवा म्हणून बघावं, असं आवाहन कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी केलं.

**<><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि महागठबंधनसह इतर पक्षांच्या नेत्यांनी आज दिवसभर प्रचाराचा धडाका लावला. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बेतिया आणि सीतामढी इथं सभा घेतल्या. याशिवाय भाजपा नेते राजनाथ सिंह, अमित शहा, मुख्यमंत्री नितीश कुमार, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही अनेक बैठकांना हजेरी लावली.

दुसरीकडे काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी पूर्णिया इथं, तर महागठबंधनचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार तेजस्वी यादव यांनी बाराछत्ती इथं प्रचार केला. समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव, जनसुराज पक्षाचे संस्थापक प्रशांत किशोर यांनीही प्रचार केला. उद्या दुसऱ्या टप्प्याच्या प्रचाराचा अखेरचा दिवस असून २० जिल्ह्यातल्या १२२ जागांसाठी येत्या मंगळवारी मतदान होणार आहे.

**<><><><>**

बिहारमधल्या समस्तीपूर जिल्ह्यामधल्या सराईरंजन मतदारसंघात ईव्हीएममधल्या व्हीव्हीपॅट पावत्या बाहेर पडल्याचं आढळून आल्यामुळे सहायक निवडणूक अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आलं आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून चौकशीचे आदेश मुख्य निवडणूक आयुक्तांनी दिले आहेत.

<><><><>

पंजाबमधे पोटनिवडणुकीत हस्तक्षेप केल्याप्रकरणी वरिष्ठ पोलीस अधीक्षक रवजोत कौर गरेवाल यांना निलंबित करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत. पंजाबमधल्या तरन तारन मतदारसंघात ११ नोव्हेंबर रोजी होऊ घातलेल्या पोटनिवडणुकीत आम आदमी पार्टीला मदत करण्यासाठी गरेवाल हस्तक्षेप करत असल्याची तक्रार शिरोमणी अकाली दलाचे नेते सुखबीर बादल यांनी केली होती. आम आदमी पार्टी निवडणुकीवर प्रभाव टाकण्यासाठी पोलिसांचा वापर करत असून पक्षाच्या कार्यकर्त्यांना बळजबरी अटक केली जात असल्याचा आरोपही अकाली दलानं केला आहे. या पार्श्वभूमीवर गरेवाल यांना निलंबित करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत.

<><><><>

मे २०२३ मध्ये दांतेवाडा जिल्ह्यात झालेल्या आयईडी स्फोट प्रकरणी राष्ट्रीय तपास संस्थेने आज नक्षलवाद्यांशी संबंधित बारा ठिकाणी छापे टाकले. या कारवाईमुळे नक्षलवादी चळवळीच्या आर्थिक नाडीवर प्रहार झाला असून बस्तरमधे शांतता प्रस्थापित होण्यासाठी हे महत्त्वाचं पाऊल असल्याचं छत्तीसगडचे गृहमंत्री विजय शर्मा यांनी म्हटलं आहे. २०२३ मध्ये दंतेवाडा जिल्ह्यातल्या अरणपूर इथं नक्षलवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात दहा डीआरजी जवान शहीद झाले होते, तर एका नागरिकाचा मृत्यू झाला होता.

<><><><>

न्यूझीलंडबरोबर मुक्त व्यापार करारासंदर्भातल्या चर्चेची चौथी फेरी आज पूर्ण झाली. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयुष गोयल आणि न्यूझीलंडचे व्यापार मंत्री टॉड मॅक क्ले यांनी या वाटाघाटींबद्दल समाधान व्यक्त केलं. या करारामुळे उभयपक्षी व्यापार, गुंतवणूक, पुरवठा साखळी आणि बाजारपेठेची उपलब्धता यांना चालना मिळेल असं मत त्यांनी व्यक्त केलं. या करारामुळे कृषी, अन्नप्रक्रिया, नवीकरणीय ऊर्जा, शिक्षण, औषध निर्मिती आणि सेवा क्षेत्रात नवीन संधी निर्माण होतील. या कराराला लवकरात लवकर अंतिम स्वरुप देण्याबाबत वचनबद्ध असल्याचंही दोन्ही मंत्र्यांनी सांगितलं.

त्यानंतर, गोयल यांनी आज मेलबर्न इथं ऑस्ट्रेलियाचे व्यापार आणि पर्यटन मंत्री डॉन फॅरेल तसंच कौशल्य आणि प्रशिक्षण मंत्री अँड्र्यू गिल्स यांच्याशी चर्चा केली.

<><><><>

रशियानं मध्यरात्री युक्रेनवर ड्रोन्स आणि क्षेपणास्त्रांनी केलेल्या हल्ल्यात १० जण ठार झाले असून २८ जण जखमी झाले आहेत. या हल्ल्यांमुळे युक्रेनच्या तीन प्रातांमध्ये महत्त्वाच्या ऊर्जा प्रकल्पांना फटका बसला आहे. रशियानं साडेचारशेपेक्षा जास्त ड्रोन्स आणि ४५ क्षेपणास्त्रं डागल्याची माहिती युक्रेनचे अध्यक्ष व्होलोदिमिर झेलेन्स्की यांनी दिली. तर, युक्रेननं डागलेले दोन हवाई बॉम्ब आणि १७८ हवाई यंत्रं पाडल्याचं रशियाच्या संरक्षण मंत्रालयानं सांगितलं.

<><><><>

अफगाणिस्तानमधल्या कंधार प्रांतातल्या बोल्दाक इथं पाकिस्ताननं आज केलेल्या हल्ल्यात सहा नागरिक मृत्युमुखी पडले, तर पाच जण जखमी झाले. पाकिस्ताननं डागलेल्या तोफांमुळे काही घरांचं आणि व्यावसायिक आस्थापनांचंही नुकसान झालं. पाकिस्ताननं युद्धविरामाचं उल्लंघन केल्याचा आरोप अफगाणिस्ताननं केला असून इस्तंबूलमध्ये पाकिस्तान आणि तालिबान अधिकाऱ्यांमध्ये झालेली शांतताविषयक चर्चा निष्फळ ठरल्यानंतर हा हल्ला झाला आहे.

<><><><>

बांग्लादेशाची राजधानी ढाकामध्ये आज आंदोलनकारी शिक्षक आणि पोलिसांमध्ये झालेल्या हिंसाचारात १२० जण जखमी झाले. वेतन आणि पदोन्नती प्रक्रियेत मोठ्या बदलांची मागणी करत प्राथमिक शिक्षकांनी उद्यापासून कामबंद आंदोलन पुकारलं आहे. कामबंद आंदोलनाचा निर्णय घेतल्यानंतर शिक्षकांनी काढलेला मोर्चा पोलिसांनी अडवण्याचा प्रयत्न केला. काही आंदोलकांनी बॅरिकेड्स तोडून पुढे जाण्याचा प्रयत्न केला, पोलिसांवर दगडफेक केली, त्यानंतर परिस्थिती चिघळली.

<><><><>

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यानचा टी ट्वेंटी क्रिकेट सामना आज पावसामुळे रद्द झाला, आणि मालिका भारताने २ विरुद्ध १ अशी जिंकल्याचं जाहीर करण्यात आलं. ब्रिस्बेनच्या गब्बा स्टेडियमवर आज सामना सुरु झाला तेव्हा ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजीसाठी आमंत्रित केलं. भारताच्या नाबाद ५२ धावा झाल्या असतानाच पावसामुळे खेळ थांबला. अभिषेक शर्मा मालिकावीर ठरला.

<><><><>

नुकत्याच झालेल्या आशिया चषक स्पर्धेच्या चषकासंबंधीचा वाद संपवण्याची तयारी दोन्ही बाजूंनी दाखवली आहे, अशी माहिती भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे सचिव देवजीत सैकिया यांनी दिली आहे. दुबई इथं झालेल्या आयसीसी मंडळाच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानी क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांच्याशी याबाबत सौहार्दपूर्ण चर्चा झाली असून दोन्ही देश काही पर्याय समोर ठेवतील आणि त्यानुसार हा तिढा लवकरात लवकर सोडवला जाईल, असं आश्वासनही सैकिया यांनी दिलं.

<><><><>

इजिप्तमध्ये सुरू असलेल्या आयएसएसएफ जागतिक नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताचा रविंदर सिंह यानं सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे. त्यानं पुरुषांच्या ५० मीटर पिस्तूल प्रकारात ५६९ गुणांची कमाई करत पहिलं स्थान पटकावलं. तसंच, रविंदर सिंह, कमलजीत आणि योगेश कुमार यांच्या संघानं पुरुषांच्या ५० मीटर पिस्तूल प्रकारात १ हजार ६४६ गुण मिळवून रौप्यपदकावर नाव कोरलं.

<><><><>

अमेरिकेत सरकारी कामकाज बंद पडल्याचा परिणाम म्हणून ५ हजारापेक्षा जास्त विमान उड्डाणं विलंबाने होत आहेत किंवा रद्द झाली आहेत. पुरेशा मनुष्यबळाअभावी हवाई वाहतूक मंत्रालयानं न्यूयॉर्क, लॉस अँजेलिस, शिकागो, आणि वॉशिंग्टन डीसी इथून निघणाऱ्या विमानांमध्ये ४ टक्के कपात केली आहे. शटडाऊन सुरुच राहिला तर पुढच्या आठवड्यात १० टक्के आणि त्यापुढच्या आठवड्यात २० टक्के कपातीची शक्यता आहे.

//<><><><>//